Vidyawardhini Sabha's
Arts, Commerce and Science College, Dhule

# Criterion - 6

## Metric: 6.5.2

Syllabus Restructuring Workshop for SYBA

Psychology (15.03.2018)

NAAC Cycle-III

Scanned with OKEN Scanner

# विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे

## मानसशास्त्र विभाग

### एस.वाय.बी.ए.मानसशास्त्र अभ्यासक्रम पुर्नरचना कार्यशाळा

दि.15-03-2018

# अहवाल

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे पत्र उमवि/21/अम/मानसशास्त्र व अर्थशास्त्र कार्यशाळा/551/2018 दि.26-02-1-2018 प्रमाणे मानसशास्त्र विभागामार्फत एस.वाय.बी.ए वर्गासाठी अभ्यासक्रम पुर्नरचना कार्यशाळेचे आयोजन दि.15-03-2018 रोजी करण्यात आले. या कार्यशाळेचे प्रमुख अतिथी मा जाखीळ (अधिसभा सदस्य कबचौउमवि, जळगाव) हे होते तर उद्घाटक प्रा मा.प्रा.डॉ.चंद्रमणी लभाणे (व्यवस्थापन परिषद सदस्य कबचौउमवि, जळगाव) हे होते कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालायचे प्राचार्य डॉ डी.एम सूर्यवंशी होते कार्यशाळेची प्रस्तावना प्रा.व्ही एम भुजाडे यांनी केली तर सूत्रसंचालन डॉ योगेश पाटील, आभार कार्यशाळेचे समन्वयक डॉ एस.जी.गोल्डे यांनी केले.

**उद्घाटन सत्र**

कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राची सुरुवात प्रा.गायत्री चव्हाण यांनी स्वागत गीताने केली. कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्रा मोहन पावरा म्हणाले कि, अभ्यासक्रमाची निर्मिती करतांना प्राध्यापकांनी रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार करण्यावर भर द्यावा. जेणे करून विद्यार्थी जेव्हा अभ्यासक्रम पूर्ण करून बाहेर पडतील तर त्यांना रोजगारासाठी सामना करावा लागणार नाही. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढलेली दिसून येते. त्या अनुषंगाने अभ्यासक्रम निर्माण झाल्यास त्यांचा फायदा विद्यार्थ्यांना या स्पर्धेच्या युगात होईल.

प्रमुख अतिथी अधिसभा सदस्य श्री जाखीळ यांनी प्राध्यापकांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, वर्तमान काळात आपल्या देशात बेरोजगारी कशी कमी होईल त्या अनुषंगाने रोजगारभिमुख

Scanned with OKEN Scanner

अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. तसेच नोकरी करणाऱ्यापेक्षा नोकरी देणारे विद्यार्थी घडवावेत. असे प्रतिपादन जाखीळ यांनी केले.

**प्रथम सत्र**

प्रथम सत्रात बी.ए द्वितीय वर्ष भारतीय अर्थव्यवस्था 1980 या पेपर संदर्भात अभ्यासक्रम पुर्नरचित करण्याचे कार्य प्रा डॉ सी.डी ठोंबरे व प्रा. आर यु जाधव यांनी केले त्यांनी आपले पुर्नरचित केलेले अभ्यासक्रम कार्यशाळेत सादर केले.त्यानंतर त्यावर साधकबाधक चर्चा झाली. या सत्रातच मानवी विकासाचे मानसशास्त्र या दुसऱ्या पेपरच्या अभ्यासक्रमासाठी डॉ एन .एस डोंगरे व डॉ एम बी बचुटे यांनी अभ्यासक्रम सादर केला. डॉ एस एस राणे व डॉ शंकर जाधव यांची समिती गठीत करण्यात आली होती व त्यांनी सदर कार्यशाळेत अभ्यासक्रमासंदर्भात अहवाल सदर केला त्यावर साधक बाधक कारचा करून साद पेपरचा अभ्यासक्रम निश्चीत करण्यात आला

**सत्र दुसरे**

दुसऱ्या सत्रात मनोविकृतीशास्त्र व समुपदेशन मानसशास्त्र या पेपर संबधी चर्चा करण्यात आली सदर पेपरच्या अभ्यासक्रम पुर्नरचनेसाठी प्रा. डॉ जयप्रकाश चौबे व प्रा. ललिता उपाध्ये यांची समिती गठीत करण्यात आली होती. त्यांनी कार्यशाळेत दिलेला अभ्यासक्रम अहवालावर चर्चा होऊन तो मंजूर करण्यात आला या सत्रात मनोविकृतीशास्त्र व समुपदेशन मानसशास्त्र या विषयाचा अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला सदर पेपरसाठी डॉ राजेश मेश्राम व डॉ सतीश सुर्वे या समितीने अभ्यासक्रमसंदर्भात वाचन केले त्यावर कार्यशाळेत सर्व अंगानी चर्चा करण्यात येऊन योग्य त्या बद्दलसह अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली.

**समारोप सत्र**

समारोप सत्राच्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.डी एस सूर्यवंशी म्हटले कि आमच्या महाविद्यालय सतत प्राध्यापक व विद्याथीच्या हितासाठी कार्य करणारे महाविद्यालय असून अभ्यासक्रम पुर्नरचनेसह अनेक संधी आमचे महाविद्यालय सतत उपलब्ध करून देते आज झालेल्या मानसशास्त्र व अर्थशास्त्र अभ्यासक्रम पुर्नरचना कार्यशाळा हे उत्तम उदाहरण आहे. समारोप आभार प्रा नागसेन बागुल यांनी केले.

Scanned with OKEN Scanner